महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
Email- preserviceedudept@maa.ac.in

जा.क्र.राशैसंप्रपम/सेवापूर्व शिक्षण/प्रवेश कक्ष/२०२३-२४/ ०३५३४ दि. ३१/०७/२०२३

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
३) शिक्षण निरीक्षक मुंबई (दक्षिण)

**विषय :-** डी.एल.एड. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२३-२४ मधील शासकीय कोट्यातील रिक्त जागा विशेष फेरीद्वारे भरणेबाबत........

**संदर्भ :-** १. मा. आयुक्त (शिक्षण) यांची दिनांक २७/०७/२०२३ ची मान्य टिपणी
२. प्राचार्य अध्यापक विद्यालये संघटना यांची प्राप्त पत्रे

राज्यस्तरीय समितीमार्फत राबविण्यात येणा-या राज्यातील अध्यापक विद्यालयातील शासकीय कोट्यातील डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाच्या तीन फे-या पूर्ण झालेल्या आहेत. तथापि शासकीय कोट्यातील जागा रिक्त राहिलेल्या आहेत. सदर रिक्त जागा विशेष फेरीद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरण्यास संदर्भीय क्र.१ अन्वये मा. आयुक्त (शिक्षण) यांनी परवानगी दिलेली आहे. करिता याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

संबंधीत जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयनिहाय रिक्त जागांचा तपशील परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य** पध्दतीने ऑनलाईन प्रवेश होतील.

१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज दि.०३ ऑगस्ट २०२३ ते दि.०७ ऑगस्ट २०२३ या कालावधीत www.maa.ac.in या संकेतस्थळावरून भरावेत. पडताळणी अधिका-यांनी दि.०३ ऑगस्ट २०२३ ते दि.०९ ऑगस्ट २०२३ या कालावधीत प्रमाणपत्रांची ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करावी.

२. या विशेष फेरीमधून इ.१२ वी उत्तीर्ण झालेले व नव्याने प्रवेश अर्ज भरण्यास इच्छुक असलेले विद्यार्थी, नियमित डी.एल.एड. प्रवेश प्रक्रियेत ऑनलाईन अर्ज पूर्ण न भरलेले, submit/approve न केलेले विद्यार्थी, दुरुस्ती (Correction) न केलेले विद्यार्थी आणि ऑनलाईन प्रवेश फेरीतून प्रवेश न घेतलेले विद्यार्थी भाग घेऊ शकतील.

३. ज्या विद्यार्थ्यांना नियमित प्रवेश प्रक्रियेमध्ये अध्यापक विद्यालय मिळाले नाही अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे प्राधान्यक्रम बदलून द्यावेत. ज्या अध्यापक विद्यालयात जागा रिक्त आहे त्या अध्यापक विद्यालयाचा पसंतीक्रम द्यावा.

४. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी डी.एल.एड. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत प्रवेशासाठी ऑनलाईन शुल्क भरले आहे. त्यांनी विशेष प्रवेश फेरीसाठी नव्याने शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. परंतु त्यासाठी जो ईमेल आयडी व मोबाईल नंबर रजिस्टर केला आहे तोच ईमेल आयडी व मोबाईल नंबर वापरणे गरजेचे आहे.

५. या प्रक्रियेबाबतचे स्थानिक वृत्तपत्रात निवेदन विनामूल्य प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हा माहिती कार्यालय यांच्या मार्फत विशेष फेरीच्या कार्यवाहीस योग्य ती प्रसिद्धी द्यावी.

६. पडताळणीसाठी प्रवेश प्रक्रिया व प्रवेश नियमावलीबाबतच्या माहितगार व अनुभवी ज्येष्ठ अधिव्याख्याता /अधिव्याख्याता यांना जबाबदारी द्यावी. कोणत्याही जिल्ह्यातील विद्यार्थी कोठेही अर्ज करू शकेल व स्वत:चे प्रवेशपत्र प्राप्त करून घेऊ शकेल याची नोंद घ्यावी.

७. विशेष फेरीतील प्रवेश प्रक्रियेसाठी प्राप्त प्रवेश अर्जाची तपासणी सन २०२३-२४ प्रवेश नियमावलीनुसार काटेकोरपणे करावी. नियमावली परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. केवळ अर्ज सादर केलेल्या पोच पावतीच्या आधारे प्रवेश निश्चित करण्यात येऊ नये.

८.विशेष फेरीत एखाद्या विद्यार्थ्यांने प्रवेश घेतला व तद्नंतर तो रद्द झाल्यास त्या जागी दुस-या विद्यार्थ्यास प्रवेश देता येणार नाही.

९. उमेदवाराचा अर्ज पडताळणी अधिका-यांनी approve केल्याशिवाय त्याचा प्रवेश निश्चित होणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. प्रवेशित विद्यार्थ्यांचे कार्यदिन पूर्ण होतील याद्दष्टीने जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांचे अध्यापनाचे वार्षिक नियोजन करणेबाबत संबंधित अध्यापक विद्यालयांना सूचना द्याव्यात.

११. व्यवस्थापन कोट्याची प्रवेश प्रक्रिया शासकीय कोट्यातील प्रवेश प्रक्रियेशी समांतर असल्याने व्यवस्थापन कोट्यातील विशेष फेरीद्वारे प्रवेशाबाबतची कार्यवाही विहित मुदतीत संबंधितांनी पूर्ण करावी. मुदतीनंतर प्रवेशाबाबतच्या केलेल्या कार्यवाही संबंधातील कोणत्याही पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. विशेष फेरीमधून प्रवेश घेतेवेळी द्यावयाच्या सूचना पुढीलप्रमाणे —

- विद्यार्थ्यांने पूर्वीप्रमाणेच www.maa.ac.in या संकेतस्थळावर जाऊन स्वत:चा अर्ज पूर्ण भरावा.
- पडताळणी अधिका-यांनी प्रमाणपत्रांची ऑनलाईन पडताळणी करावी.
- अर्ज approve झाल्यानंतर विद्यार्थ्यांने स्वत:चे Login उघडावे.
- Login केल्यानंतर 7th step open करावी व तेथील "click to find seat & take admission" यावर click करावे.
- ज्या अध्यापक विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्याचा विभाग, जिल्हा अध्यापक विद्यालय प्रकार इ. निवडावा.
- ज्या अध्यापक विद्यालयात जागा रिक्त आहेत ते अध्यापक विद्यालय विद्यार्थ्यांने निवडावे व तेथील "Take admission" या बटणवर click करावे.

- पुन्हा एकदा आपल्याला हवे असलेलेच अध्यापक विद्यालय निवडल्याची खात्री करावी व नंतरच "Yes Confirm seat" या बटणवर clickकरावे. एकदा clickकेल्यानंतर यामध्ये पुन्हा कोणताही बदल करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.
- अध्यापक विद्यालय निवडल्यानंतर विद्यार्थ्यांने "Print admission letter" वर click करून स्वत:च्या प्रवेशपत्राची Print काढून घ्यावी.
- प्रवेशपत्र घेऊन विद्यार्थ्यांने ४ दिवसांचे आत अध्यापक विद्यालयात जाऊन प्रत्यक्ष प्रवेश घ्यावा.
- अध्यापक विद्यालय प्राचार्यांनी पुनश्च प्रमाणपत्रांची पडताळणी करून पूर्वीप्रमाणेच विद्यार्थ्यांस online पध्दतीने अध्यापक विद्यालय Login मधून प्रवेश द्यावा.

करिता उपरोक्त प्रमाणे विशेष फेरी संदर्भातील प्रवेश प्रक्रियेतील कार्यवाही करण्यात यावी.

मूळ टिपणी मा. आयुक्त (शिक्षण) यांनी मान्य केलेली आहे.

(रमाकांत काठमोरे)
**सहसंचालक**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**

१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे

**प्रत –**

१) मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे

## विशेष फेरी वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे | दि. ०३/०८/२०२३ ते दि. ०७/०८/२०२३ |
| २. | पडताळणी अधिका-यांनी प्रमाणपत्रांची ऑनलाईन **पडताळणी करणे** | दि. ०३/०८/२०२३ ते दि. ०८/०८/२०२३ |
| ३. | पडताळणी केलेल्या अर्जात दुरुस्ती **असल्यास** विद्यार्थ्यांनी **दुरुस्ती करणे.** | दि. ०३/०८/२०२३ ते दि. ०९/०८/२०२३ (दु.२.००वाजेपर्यंत) |
| ४. | दुरुस्ती केलेल्या अर्जांची पडताळणी अधिका-यांनी **ऑनलाईन पडताळणी करणे** | दि. ०३/०८/२०२३ ते दि ०९/०८/२०२३ (सायं.५.००वाजेपर्यंत) |
| ५. | विद्यार्थ्यांनीस्वत:च्या login **मधून** प्रवेश घ्यावयाचे **अध्यापक विद्यालय निश्चित करून स्वत:चे प्रवेशपत्र काढून घेणे** | दि. ०३/०८/२०२३ ते दि. १०/०८/२०२३ |
| ६. | प्राचार्य संबंधित **अध्यापक** विद्यालय यांनी प्रवेशित **विद्यार्थ्यांचे** प्रमाणपत्रांची **पडताळणी करून** स्वत:चे login **मधून** विद्यार्थ्यांना ऑनलाईन admit करून घेणे | दि. ०३/०८/२०२३ ते दि.१४/०८/२०२३ |

## वेळापत्रक (व्यवस्थापन कोटा)

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज **सादर** करणे | दि.०३/०८/२०२३ ते दि.०७/०८/२०२३ |
| २. | विद्यार्थ्यांना **अध्यापक** विद्यालयाच्या लॉगीनमध्ये **समाविष्ट करून घेणे** | दि.०३/०८/२०२३ ते दि.०९/०८/२०२३ |
| ३. | **अध्यापक** विद्यालयांनी **व्यवस्थापन** कोटा प्रवेशाचे **प्रस्ताव संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे ऑनलाईन सादर करणे** (Forward) | दि.१०/०८/२०२३ |
| ४. | विभागीय शिक्षण **उपसंचालक** यांनी ऑनलाईन प्राप्त **प्रस्ताव तपासून त्यांचे** login **मधून** प्रवेश confirm करणे | दि.१०/०८/२०२३ ते दि.१४/०८/२०२३ |

विहित कालावधीत संबंधितांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांची राहील याची नोंद घ्यावी.

(रमाकांत काठमोरे)
**सहसंचालक**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे